**नियमीत दिवाणी दावा क्र.१८/२०१६**
**(दादु मोहिते वि. शौकत लोहार)**

**निशाणी क्र.४९, ५१, ५३ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी शौकत दादा लोहार यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून मिळणेकरिता, वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत आणि वारस रेकॉर्डवर घेणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे.

२. वादीने त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रतिवादी शौकत दादा लोहार दि.२९.०५.२०२० रोजी मयत झाले आहेत. तथापि, मयत प्रतिवादी यांचे कायदेशिर व सरळ वारस रेकॉर्डवरती आणणेसाठी वादी यांना विलंब झालेला आहे. सदरचा दावा कायद्यास अभिप्रेत असलेल्या मुदतीत वारस रेकॉर्डवरती न आणलेले प्रतिवादी यांचेविरुध्दचा दावा अबेटमेंटचा हुकूम झालेला आहे. सदरचा विलंब हा वादी यांनी जाणुनबुजून व हेतुपुरस्कररित्या केलेला नाही. म्हणून वादीने वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवून अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड होवून वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रस्तावित प्रतिवादी यांनी निशाणी क्र.७४ ते ७६ वर त्यांचे म्हणणे सादर करुन सदरचे अर्ज खोटा व खोडसाळ असल्याने अर्जामध्ये संयुक्तिक कारणे नमुद न केल्याने व सदरचा अर्ज विलंबाने सादर केला असल्याने सदरचे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. अभिलेख पाहिला.

५. प्रस्तुत वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावा अतिक्रमीत दावामिळकतीचा कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. प्रतिवादी हे दि.१९.०५.२०२० रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेतल्यास प्रस्तावित प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही. याउलट विलंब माफ न झाल्यास वादी यांचे पैशाने कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. मुळ दाव्याचे स्वरुप पाहता मयत प्रतिवादी यांचे वारस

अभिलेखावर घेणेस आवश्यक आहे. म्हणून वादी यांचा नि.४९ कडील अर्ज विलंब माफीचा अर्ज मंजूर करुन प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश सेटअसाईड करुन नि.५१ व ५३ प्रमाणे नमुद वारसांना याकामी अभिलेखात सामील करणेत येत आहे. सबब, या निष्कर्षास अनुसरुन मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**:: आदेश ::**

१. वादी यांचा नि.४९, ५१ आणि ५३ कडील अर्ज मंजूर करण्यात येते.

२. वादी यांनी नि.४९, ५१ आणि ५३ कडील अर्ज दंड रक्कम रु.५००/– प्रतिवादी यांना देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

३. दंड रक्कम भरलेनंतर वादी यांनी मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखात सामील करुन तशी दुरुस्ती दाव्यात करावी व दुरुस्त दाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत दाखल करावी.

sd/–

**पलूस.** **(एम.ए.एम.जे. शेख)**

**दि.२५.०३.२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पलूस.**